# स्व-विकास व कलारसास्वाद

इयत्ता ९

# भारताचे संविधान

## भाग ४ क

# नागरिकांची मूलभूत कर्तव्ये

**अनुच्छेद ५१ क**

**मूलभूत कर्तव्ये – प्रत्येक भारतीय नागरिकाचे हे कर्तव्य असेल की त्याने –**

(क) प्रत्येक नागरिकाने संविधानाचे पालन करावे. संविधानातील आदर्शांचा, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीताचा आदर करावा.

(ख) स्वातंत्र्याच्या चळवळीला प्रेरणा देणाऱ्या आदर्शांचे पालन करावे.

(ग) देशाचे सार्वभौमत्व, एकता व अखंडत्व सुरक्षित ठेवण्यासाठी प्रयत्नशील असावे.

(घ) आपल्या देशाचे रक्षण करावे, देशाची सेवा करावी.

(ङ) सर्व प्रकारचे भेद विसरून एकोपा वाढवावा व बंधुत्वाची भावना जोपासावी. स्त्रियांच्या प्रतिष्ठेला कमीपणा आणतील अशा प्रथांचा त्याग करावा.

(च) आपल्या संमिश्र संस्कृतीच्या वारशाचे जतन करावे.

(छ) नैसर्गिक पर्यावरणाचे जतन करावे. सजीव प्राण्यांबद्दल दयाबुद्धी बाळगावी.

(ज) वैज्ञानिक दृष्टी, मानवतावाद आणि जिज्ञासूवृत्ती अंगी बाळगावी.

(झ) सार्वजनिक मालमत्तेचे जतन करावे. हिंसेचा त्याग करावा.

(ञ) देशाची उत्तरोत्तर प्रगती होण्यासाठी व्यक्तिगत व सामूहिक कार्यात उच्चत्वाची पातळी गाठण्याचा प्रयत्न करावा.

(ट) ६ ते १४ वयोगटातील आपल्या पाल्यांना पालकांनी शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात.

शासन निर्णय क्रमांक : अभ्यास-२११६/(प्र.क्र.४३/१६) एसडी-४ दिनांक २५.४.२०१६ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या
समन्वय समितीच्या दि. ३.३.२०१७ रोजीच्या बैठकीमध्ये हे पाठ्यपुस्तक निर्धारित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.



# स्व-विकास व कलारसास्वाद

## इयत्ता नववी

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे ४.

C5YH9N

आपल्या स्मार्टफोनवरील DIKSHA App द्वारे पाठ्यपुस्तकाच्या पहिल्या पृष्ठावरील Q.R. Code द्वारे डिजिटल पाठ्यपुस्तक व प्रत्येक पाठामध्ये असलेल्या Q.R.Code द्वारे त्या पाठासंबंधित अध्ययन-अध्यापनासाठी उपयुक्त दृक्-श्राव्य साहित्य उपलब्ध होईल.

प्रथमावृत्ती : २०१७
पुनर्मुद्रण : २०२१

© महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे – ४११ ००४.

या पुस्तकाचे सर्व हक्क महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्धृत करता येणार नाही.

**स्व–विकास व कलारसास्वाद विषय समिती**

डॉ. शिरीषा साठे, अध्यक्ष
श्रीमती शीतल बापट, सदस्य
श्री. विद्यानिधी (प्रसाद) वनारसे, सदस्य
श्रीमती आभा भागवत, सदस्य
श्रीमती प्रतिभा कदम, सदस्य
डॉ. अजयकुमार लोळगे, सदस्य–सचिव

**निमंत्रित**

श्रीमती सायली तामणे
श्री. मनिष पिंपळे
श्रीमती परिणिता बालसुब्रमण्य
श्रीमती केतकी शहा
डॉ. मधुवंती साठे
श्रीमती मंजिरी टकले
श्रीमती नीता मुतालीक
श्रीमती कल्पना संचेती
श्री. इम्तियाज शेख
श्री. संजय बुगटे
श्री. शिवाजी हांडे
श्री. रूपेश पंगेरकर
श्रीमती मनिषा अष्टपुत्रे
श्रीमती सुमेधा लेले
श्रीमती निशिगंधा शेजूळ
श्रीमती शामलाताई वनारसे

**मुखपृष्ठ व सजावट**

श्रीमती फाल्गुनी गोखले
श्रीमती मधुरा पेंडसे

**विशेष सहकार्य**

संशोधन व विकास विभाग
श्यामची आई फाऊंडेशन

**प्रकाशक**

श्री. विवेक गोसावी
नियंत्रक,
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ,
प्रभादेवी, मुंबई–२५

**संयोजक** : डॉ. अजयकुमार लोळगे, विशेषाधिकारी कार्यानुभव व प्र. विशेषाधिकारी कला, पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे.

**अक्षरजुळणी** : रुना ग्राफिक्स, सिंहगड रोड, पुणे.

**निर्मिती** : श्री. सच्चितानंद आफळे, मुख्य निर्मिती अधिकारी
श्री. सचिन मेहता, निर्मिती अधिकारी
श्री. नितिन वाणी, सहायक निर्मिती अधिकारी

**कागद** : ७० जी.एस.एम. क्रिमवोव्ह

**मुद्रणादेश** : N/PB/2021-22/55,000

**मुद्रक** : M/S. ADARSHA VIDYARTHI PRAKASKAN, PUNE

# भारताचे संविधान

## उद्देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडविण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस:

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**
दर्जाची व संधीची **समानता;**

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

## राष्ट्रगीत

जनगणमन–अधिनायक जय हे
भारत–भाग्यविधाता ।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत–भाग्यविधाता ।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे ।।

## प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.

# प्रस्तावना

**विद्यार्थी मित्रांनो,**

इयत्ता नववीच्या वर्गात तुम्हां सर्वांचे स्वागत आहे. 'स्व-विकास व कलारसास्वाद' या विषयाचे पाठ्यपुस्तक तुमच्या हाती देताना आम्हांला विशेष आनंद होत आहे.

२१ व्या शतकात आवश्यक असलेली जीवनकौशल्ये आत्मसात करण्यासाठी व तुमच्या करिअरच्या यशस्वी वाटचालीसाठी या विषयातून आवश्यक ते मार्गदर्शन तुम्हांला मिळेल. पुढील जीवनातील आव्हानांना तुम्ही सक्षमपणे सामोरे जाऊ शकाल. तसेच स्व-ओळख करून घेऊन स्वत:च्या संधी ओळखण्याची क्षमता तुमच्यात निर्माण होईल, असा विश्वास वाटतो.

तुम्हांला माहीतच आहे, की मानवी जीवनातील कलेचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. तसेच कलेमुळे आपले आयुष्य समृद्ध होण्यास मदत होते. त्यामुळे कलारसास्वाद हा भागही तितकाच महत्त्वाचा आहे.

स्व-विकास व कलारसास्वाद या पाठ्यपुस्तकाचा मूळ हेतू हा तुमच्या दैनंदिन जीवनाशी निगडित गोष्टींशी आहे. पुस्तिकेची सुरुवात तुम्हांला आवडणाऱ्या चित्रमय कथेतून केली आहे. चित्रातून पुढच्या प्रकरणात काय शिकणार आहोत याचा संदेश दिला आहे. या पाठ्यपुस्तकातून 'थोडी गंमत व चर्चा करा' अशा अनेक कृतींतून तुम्ही हा विषय शिकणार आहात. या सर्व कृती तुम्ही आवर्जून करा. या कृती तुमच्या विचारप्रक्रियेला चालना देतील.

पाठ्यपुस्तकात अनेक छोट्या छोट्या खेळांचा समावेश केलेला आहे. त्या खेळांतून तुम्ही बरेच काही शिकणार आहात. दिलेला प्रकल्प, त्याची कार्यवाही व त्या दरम्यान आवश्यक असणारी कृती तुम्ही स्वत: काळजीपूर्वक करा. तसेच आवश्यक तेथे तुमच्या शिक्षकांची, पालकांची व वर्गातील सहकाऱ्यांची मदत घ्या. आजच्या तंत्रज्ञानाच्या वेगवान युगात संगणक, स्मार्टफोन हे तर तुमच्या परिचयाचे आहेतच. पाठ्यपुस्तकातून अभ्यास करताना माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाच्या साधनांचा सुयोग्य वापर करा जेणेकरून तुमचे अध्ययन सुकर होईल.

पाठ्यपुस्तक वाचताना, अभ्यासताना आणि समजून घेताना तुम्हांला त्यातील आवडलेला भाग तसेच अभ्यास करताना येणाऱ्या अडचणी, पडणारे प्रश्न आम्हांला जरूर कळवा.

तुम्हांला तुमच्या शैक्षणिक प्रगतीसाठी हार्दिक शुभेच्छा !

**(डॉ. सुनिल मगर)**
संचालक
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

पुणे
दिनांक : २८ एप्रिल, २०१७, अक्षय्यतृतीया
भारतीय सौर : ८ वैशाख १९३९

# स्व–विकास व कलारसास्वाद क्षमता विधाने

**इयत्ता नववीच्या अखेरीस विद्यार्थ्यांमध्ये पुढील क्षमता विकसित व्हाव्यात, अशी अपेक्षा आहे.**

| अ.क्र. | घटक | क्षमता विधाने |
|---|---|---|
| १. | स्व–ओळख | १. **‘स्व’ची जाणीव/स्वयंबोधन** – स्वत: संबंधी एक सुसंगत चित्र मनात विकसित होणे.<br>२. **स्वयं व्यवस्थापन** – स्वत:ची वैयक्तिक, सामाजिक आणि आर्थिक बलस्थाने व मर्यादा ओळखता येणे व त्यांचे विश्लेषण करण्याची क्षमता विकसित करणे.<br>३. **विविधतेचा स्वीकार** – अवतीभोवतीच्या लोकांमधील विविधता स्वीकारण्याची व तिचे महत्त्व जाणून तिचे समर्थन करण्याची क्षमता विकसित करणे. |
| २. | वाढीचे वय | १. **‘स्व’ची जाणीव/स्वयंबोधन** – किशोरावस्थेतील बदल व त्या अनुषंगाने उद्भवणाऱ्या संभाव्य धोक्यांबाबत असणारी समज विकसित करणे.<br>२. **भावनांना व्यवस्थितरीत्या हाताळणे** – किशोरावस्थेच्या दरम्यान होत असलेल्या भावनिक बदलांना व्यवस्थितरीत्या हाताळण्याची क्षमता विकसित करणे.<br>३. **चिकित्सक विचार** – दैनंदिन आयुष्यातील घटना व परिस्थितीचे विश्लेषण करून योग्य पर्याय निवडता येण्याची क्षमता विकसित करणे.<br>४. **आत्मविश्वास** – धोक्याचे व बेजबाबदार वर्तन टाळण्यासाठी योग्य पर्याय निवडण्याचा आत्मविश्वास जागृत करणे. |
| ३. | मूल्ये | १. **‘स्व’ची जाणीव/स्वयंबोधन** – स्वत:च्या वैयक्तिक मूल्यांबद्दल व मूल्याधिष्ठित जीवनाच्या महत्त्वाबद्दलची जाणीव विकसित करणे.<br>२. **स्वयं व्यवस्थापन** – मूल्याधिष्ठित जीवन जगण्याकरता स्वत:मध्ये करायच्या बदलांचे नियोजन करण्याची क्षमता विकसित करणे.<br>३. **चिकित्सक विचार** – स्वत:ची मूल्ये व प्रत्यक्ष वर्तन यांचे विश्लेषण करून त्यातील विपर्यास स्पष्टपणे दाखवता येण्याची क्षमता विकसित करणे. |
| ४. | सामाजिक नेतृत्व | १. **सामाजिक भान आणि जबाबदारी** – अवतीभोवती असलेल्या सामाजिक समस्या आणि त्या अनुषंगाने स्वत:ची समाजाप्रत असलेली जबाबदारी यांबाबतची जाणीव विकसित करणे.<br>२. **सहवेदना** – समाजात अस्तित्वात असणारी परस्परावलंबित्वाची जाणीव व त्या अनुषंगाने इतर लोकांबाबत सहवेदना विकसित करणे.<br>३. **नेतृत्व क्षमता/नेतृत्व गुण** – समाजात एखादा छोटासा बदल घडवण्यासाठी आवश्यक असलेला नेतृत्व गुण विकसित करणे.<br>४. **चिकित्सक विचार** – सामाजिक समस्यांचे चिकित्सकरीत्या विश्लेषण करून त्यांची व्याप्ती व गांभीर्य निर्धारित करण्याची क्षमता विकसित करणे. |

| अ.क्र. | घटक | क्षमता विधाने |
|---|---|---|
| | सामाजिक नेतृत्व | ५. **समस्या निराकरण** – सामाजिक समस्यांचे निराकरण करण्यासाठी योग्य पर्याय निवडून समस्या सोडवण्याच्या दृष्टीने कृती करण्याची क्षमता विकसित करणे.<br>६. **ध्येयबांधणी** – वैयक्तिक व सामाजिक बदल घडवून आणण्याकरता वास्तववादी व मापनीय ध्येय सुनिश्चित करण्याची क्षमता विकसित करणे.<br>७. **सांघिक कार्य** – एकजुटीने सांघिक कार्य करण्याची क्षमता विकसित करणे. |
| ५. | कलारसास्वाद दृश्य कला | १. **कलेबद्‌दलची जाणीव** – दृश्य कलांचे विविध प्रकार, दृश्य कलेचे मूलभूत घटक यांबाबतची जाणीव विकसित करणे.<br>२. **कलाविष्कार निर्मिती** – विविध दृश्यकलांपैकी एकीचा वापर करून एखादा कलाविष्कार निर्माण करण्याची क्षमता विकसित करणे.<br>३. **अभिव्यक्ती** – दृश्य कलेच्या माध्यमातून स्वत:चे विचार, भावना व अनुभव व्यक्त करता येण्याची क्षमता विकसित करणे.<br>४. **सर्जनशीलता** – एखाद्या कलाविष्कारात दृश्य कलेच्या मूलभूत घटकांचा वापर करून नवनिर्मिती करता येण्याची क्षमता विकसित करणे.<br>५. **सौंदर्यदृष्टी** – (अ) एखाद्या कलाविष्कारात वापरले गेलेले दृश्य कलेतील मूलभूत घटक ओळखण्याची क्षमता विकसित करणे. (आ) एखाद्या कलाविष्काराचे निरीक्षण करून त्यातील स्वत:ला भावणाऱ्या घटकांचे वर्णन स्वत:च्या शब्दांत करण्याची क्षमता विकसित करणे.<br>६. **प्रत्यक्ष जीवनातील उपयोजन** – (अ) कलेचे महत्त्व सांगता येण्याची क्षमता विकसित करता येणे. (आ) एखाद्या स्थानिक व्यावसायिक कलाकाराच्या कामासंदर्भातील दैनंदिन व्यावसायिक पैलूंविषयक समज विकसित करणे. |
| ६. | संघर्ष मिटवणे | १. **सर्जनशील विचार** – संघर्ष मिटवण्यासाठी नावीन्यपूर्ण मार्ग शोधण्याची क्षमता विकसित करणे.<br>२. **चिकित्सक विचार** – एखाद्या संघर्षजन्य परिस्थितीचे वस्तुनिष्ठपणे विश्लेषण करून ती सर्व बाजूंनी समजून घेण्याची क्षमता विकसित करणे.<br>३. **समस्या निराकरण** – समवयस्क दबावगट अथवा दैनंदिन जीवनातील अन्य संघर्षजन्य परिस्थिती हाताळताना सर्वांत योग्य पर्याय निवडण्याची क्षमता विकसित करणे.<br>४. **प्रभावी संप्रेषण** – इतरांचे विचार जाणून घेणे, स्वत:चे विचार स्पष्टपणे शब्दबद्‌ध करणे व प्रभावीरीत्या इतरांशी संप्रेषण करणे यांबाबतची क्षमता विकसित करणे.<br>५. **व्यक्तींमधील अंतर्गत संबंध** – दोन्ही बाजूंचे हित साधून शांततामय मार्गाने, एकमेकांशी असलेल्या अंतर्गत संबंधांना इजा न पोहोचवता, संघर्ष सोडवण्याची क्षमता विकसित करणे. |

| अ.क्र. | घटक | क्षमता विधाने |
|---|---|---|
| ७. | वाढीस पूरक मानसिकता | १. **'स्व'ची जाणीव** – स्वत:च्या गुणांबद्दल, बुद्धिमत्तेबद्दल, कौशल्यांबद्दल स्वत:ची असणारी मानसिकता ओळखण्याची क्षमता विकसित करणे.<br>२. **आत्मविश्वास** – वाढीस पूरक मानसिकतेतून विचार करून स्वत:च्या मर्यादांवर मात करण्यासाठी गरजेचा असलेला आत्मविश्वास विकसित करणे.<br>३. **चिकित्सक विचार** – वाढीस पूरक मानसिकतेतून विचार करून स्वत:च्या उणिवांचे विश्लेषण करून त्यांवर मात करण्यासाठी विविध मार्ग शोधण्याची क्षमता विकसित करणे.<br>४. **स्वयं व्यवस्थापन** – स्वत:च्या उणिवांवर मात करून यशस्वी होण्याच्या दृष्टीने योग्य नियोजन करण्याची क्षमता विकसित करणे. |
| ८. | करिअर | १. **'स्व'ची जाणीव** – करिअर घडविण्याच्या दृष्टीने स्वत:ची आवड, क्षमता व उपलब्ध संधी यांबाबत जाणीव विकसित करणे.<br>२. **चिकित्सक विचार** – वस्तुनिष्ठ पुरावे व सत्य परिस्थितीच्या आधारे स्वत:ची आवड, क्षमता व संधी यांचा चिकित्सकरीत्या विचार करून ते शब्दांकित करण्याची क्षमता विकसित करता येणे.<br>३. **निर्णय क्षमता** – आवडीप्रमाणे कोणत्याही एका क्षेत्राची निवड करण्याची व त्याचे समर्थन करण्याची क्षमता विकसित करणे.<br>४. **सांघिक कार्य** – समूहामध्ये कार्य करत असताना समान आवडीच्या क्षेत्रांबद्दल अधिक माहिती शोधण्यासाठी गटांत सांघिक कार्य करण्याची क्षमता विकसित करणे. |
| ९. | कलारसास्वाद प्रयोगजीवी कला | १. **कलेबाबतची जाणीव** – प्रयोगजीवी कलेचे विविध प्रकार आणि मूलभूत घटक यांबाबतची जाणीव विकसित करणे.<br>२. **सादरीकरण** – प्रयोगजीवी कलेच्या विविध प्रकारांचा वापर करून सादरीकरण करण्याची क्षमता विकसित करणे.<br>३. **अभिव्यक्ती** – स्वत:चे विचार, भावना व अनुभव प्रयोगजीवी कलांच्या माध्यमातून व्यक्त करता येण्याची क्षमता विकसित करणे.<br>४. **सर्जनशीलता** – एखाद्या प्रयोगजीवी कलेमध्ये, स्वत:च्या सर्जनशीलतेच्या आधारे नवनिर्मिती करता येण्याची क्षमता विकसित करणे.<br>५. **प्रत्यक्ष जीवनातील उपयोजन** – प्रयोगजीवी कलेच्या महत्त्वाबाबतची जाणीव व्यक्त करण्याची क्षमता विकसित करणे. |

## शिक्षकांसाठी

**मित्रहो,**

'स्व-विकास व कलारसास्वाद' हा नवीन विषय शिकविण्याची अत्यंत महत्त्वपूर्ण, आव्हानात्मक पण तितकीच आनंददायी जबाबदारी आपल्यावर सुपूर्द करण्यात आली आहे त्याबद्दल प्रथम आपले अभिनंदन. या विषयाचे महत्त्व, वेगळेपण तसेच यातून काय साध्य होणे अपेक्षित आहे याबद्दल स्पष्टता आल्यास शिक्षणप्रक्रियेची परिणामकारकता वाढेल व विद्यार्थ्यांसाठी घेत असलेल्या मेहनतीस नक्की यश लाभेल असा समितीला विश्वास वाटतो.

**विषयाची गरज :**

१. इयत्ता ९ वी व १० वी हा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण काळ असतो. पण याच काळात विद्यार्थ्यांमध्ये झपाट्याने शारीरिक, मानसिक बदल घडत असतात व त्या सर्व बदलांचा प्रभाव त्यांच्या अभ्यासावर, पालकांशी, शिक्षकांशी असलेल्या संबंधांवर, त्यांनी घेतलेल्या निर्णयांवर पडत असतो. या बदलांचे स्वरूप व त्यांना यशस्वीपणे हाताळण्याचे मार्ग जर विद्यार्थ्यांनी समजून घेतले तर त्यामुळे होणारे अनिष्ट परिणाम टाळता येतील.

२. याच काळात विद्यार्थी स्वत:बद्दल, स्वत:च्या आवडी निवडी, मित्र-मैत्रिणी, भविष्याबद्दल जागरूकपणे विचार करू लागतात. स्वत:बद्दलच्या त्यांच्या या विचारांना शालेय अभ्यासक्रमात स्थान मिळाल्यास त्यांच्या विचारांना दिशा मिळू शकेल व स्वत:कडे त्रयस्थपणे बघून स्वत:तील गुण-दोष त्यांना समजू शकतील. या हेतूने 'स्व-विकास व कलारसास्वाद' या विषयाचा अभ्यासक्रमात समावेश करण्यात आला आहे.

३. परिपूर्ण मानवी जीवन जगण्यासाठी कोणत्यातरी एका कलेशी जोडून घेणे, तिच्याशी नाते निर्माण करणे अत्यंत गरजेचे असते. विविध कलांशी विद्यार्थ्यांची ओळख जरी प्राथमिक शिक्षणापासून झाली असली तरी या कलांचे महत्त्व समजणे, त्यांचे मानवी जीवनातील स्थान समजणे, त्यांतील सौंदर्य पाहता येणे हे स्व-विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. समृद्ध, सुसंस्कृत नागरिक तयार करण्याच्या दृष्टीने कलारसास्वाद या भागाचा या विषयात अंतर्भाव करण्यात आला आहे.

**अशा प्रकारे शालेय जीवनातून बाहेरच्या विश्वात पाऊल ठेवणाऱ्या विद्यार्थ्यांना, बाहेरील जगात आत्मविश्वासाने जगण्यासाठी सुसज्ज करण्याच्या हेतूने निर्माण करण्यात आलेला हा एक सेतू आहे असे या विषयाकडे पाहता येईल.**

**अध्ययन-अध्यापन प्रक्रिया:**

हा विषय शिकविण्याची पद्धत व त्यातून अपेक्षित परिणाम इतर शालेय विषयांपेक्षा भिन्न असल्यामुळे ती पद्धत नीट समजून घेऊन त्या पद्धतीने त्याची अंमलबजावणी करणे अनिवार्य आहे.

१. या पुस्तिकेतील सर्व आशय हा रचनावादी पद्धतीने शिकवायचा असून त्यासाठी योग्य ते उपक्रम, प्रश्न व सूचना पुस्तिकेत देण्यात आलेल्या आहेत. कोणतेही प्रकरण **शिकवण्याआधी** त्याचा संपूर्ण अभ्यास करणे अपेक्षित असून त्यातील उपक्रमांचे नियोजन करावयाचे आहे. गरज असेल तेव्हाच फक्त विद्यार्थ्यांसमोर पुस्तिका उघडून वाचन करावे.

२. या विषयाचे यश हे कोणतीही ‘माहिती’ विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यात नसून विद्यार्थ्यांना स्वत:बद्दल, इतरांबद्दल विचार करण्यास उद्युक्त करण्यावर अवलंबून आहे. वर्गात घडणाऱ्या प्रक्रिया, उपक्रम, होणारा संवाद, गटकाम, विद्यार्थ्यांचे आत्मपरीक्षण हेच विद्यार्थ्यांचे खरे शिक्षण आहे. या प्रक्रिया घडवून आणणे हेच या विषयाचे साध्य आहे. सर्व उपक्रम योग्य पद्धतीने घेऊन मोकळी व अर्थपूर्ण चर्चा घडवून आणणे हेच आपले कर्तव्य आहे. यात आपली भूमिका ही सुलभकाची हवी.

३. या विषयामध्ये विद्यार्थ्यांनी स्वत:बद्दल, स्वत:च्या अडचणींबद्दल मोकळेपणाने बोलणे अपेक्षित आहे. यासाठी वर्गातील वातावरण विद्यार्थ्यांना आश्वासक व खेळीमेळीचे असणे गरजेचे आहे. त्यासाठी जागरूक असणे अत्यंत महत्त्वाचे आहे. विद्यार्थ्यांवर कोणत्याही प्रकारचे दडपण, भीती असल्यास संपूर्ण उपक्रम अर्थहीन ठरेल. विद्यार्थ्यांनी सांगितलेल्या समस्या, अडचणी गांभीर्याने घ्याव्यात.

४. पुस्तिकेतील प्रत्येक उपक्रमाला न्याय देऊन त्यानंतरची चर्चा किंवा गटकाम अर्थपूर्ण पद्धतीने घडवून आणण्याचा प्रयत्न करावा. **विषयाचा मुख्य गाभा त्यातील उपक्रम, चर्चा, गटकार्यातच आहे हे नेहमी लक्षात ठेवावे.** कोणत्याही कारणास्तव, विशेषत: अभ्यासक्रम पूर्ण करण्याची घाई करून चर्चेला किंवा गटकार्यास टाळू नये.

५. बहुतेक सर्व उपक्रमांवर मुक्त चर्चा अपेक्षित असून त्यात कोणतेही एक चूक किंवा बरोबर उत्तर नाही हे लक्षात घ्यावे. विद्यार्थ्यांनी स्वत: विचार करणे, तर्कसंगत उत्तर देणे व त्यांच्या उत्तराचे त्यांच्यापरीने समर्थन करता येणे एवढेच अपेक्षित आहे.

६. शक्यतो विद्यार्थ्यांना प्रश्नाचे किंवा परिस्थितीचे सर्व बाजूने आकलन होईल यासाठी दोन्ही बाजूने प्रश्न विचारून त्यांना सखोलपणे विचार करायला भाग पाडणे अपेक्षित आहे.

**गुणांचे नियोजन :**

१. या विषयासाठी कोणतीही लेखी परीक्षा नाही. मात्र वर्गातील शैक्षणिक प्रक्रियेचे सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन व नोंदी ठेवणे अपेक्षित आहे.

२. विद्यार्थ्यांनी या विषयासाठी एक कोरी २०० पानी वही करावी व जे उपक्रम वहीत सोडवणे अपेक्षित आहेत ते त्यात सोडवावे. कोणत्याही प्रकारचे इतर साहित्य त्यासाठी वापरण्यात येऊ नये.

३. प्रत्येक प्रकरणानंतर एक मूल्यमापन आराखडा देण्यात आलेला आहे. त्याप्रमाणे विद्यार्थ्यांचे सातत्यपूर्ण मूल्यमापन करून त्याच्या नोंदी स्वत:कडे ठेवणे अपेक्षित आहे. विद्यार्थ्यांनी वहीत केलेले काम तपासून त्याला पुस्तिकेत दिलेल्या भारांशाप्रमाणे गुण देणे अपेक्षित आहे. वर्षाअखेर विद्यार्थ्यांना मिळालेल्या गुणांची बेरीज करून त्यावरून त्यांची श्रेणी ठरवण्यात यावी.

# अनुक्रमणिका


| अनुक्रमांक | प्रकरणाचे नाव | पृष्ठ |
|---|---|---|
| १. | स्व–ओळख | १ |
| २. | वाढीचे वय | १४ |
| ३. | मूल्ये | २२ |
| ४. | सामाजिक नेतृत्व | ३१ |
| ५. | कला रसास्वाद – दृश्य कला | ४२ |
| ६. | संघर्ष मिटवणे | ५८ |
| ७. | वाढीस पूरक मानसिकता | ७३ |
| ८. | करिअर | ८३ |
| ९. | कला रसास्वाद – प्रयोगजीवी कला | ९४ |